जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट दिनांक १७.१०.२०२४

# पत्नीचा खुन करून पळुन गेलेल्या आरोपीस शिताफीने अटक

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०८.१०.२०२४ रोजी सायंकाळी १७:३० वा. ते १८:१५ वा. चे दरम्यान, पार्श्वहिल सोसायटी, सी/१०३, पालेगाव, अंबरनाथ पुर्व, जि.ठाणे येथे इसम नामे विकी बबन लोंढे, वय २७ वर्षे याने त्याची पत्नी रूपाली विकी लोंढे, वय २६ वर्षे ही त्यांचे मुलीचा संभाळ व्यवस्थित करीत नसल्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद होवुन झालेल्या भांडणामध्ये आरोपीत विकी बबन लोंढे याने त्याची पत्नी रूपाली विकी लोंढे हीचा पटयाच्या सहाय्याने गळा आवळुन खाली पाडुन नंतर सुरीने गळा कापुन तिस गंभीर जखमी करून तिस जिवे ठार मारून पळुन गेल्याने त्याच्याविरूध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. । ८३४/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०३(१) प्रमाणे दिनांक ०९.१०.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे गांर्भीर्य ओळखुन गुन्हयाचा तपास वपोनि/श्री.रमेश पाटील यांचेकडे देण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी विकी बबन लोंढे याचा शोध घेणेकामी तीन वेगवेगळी पोलीस पथके तयार करून रवाना करण्यात आली होती. आरोपीत याचे मित्र व नातेवाईक यांचेकडे चौकशी करून तसेच आरोपीच्या मोबाईलचे तांत्रीक विश्लेषनाच्या सहाय्याने आरोपीत याचे वास्तव्य वाराणसी, उत्तरप्रदेश येथील आल्याने तपास पथकातील पोउनि/शेख, पोहवा/३११२ सौंदाणे व पोहवा/६३१० पादीर हे तात्काळ वाराणसी येथे रवाना होवुन तेथे आरोपीत याचा शोध घेवुन मोठया शिताफिने आरोपी विकी बबन लोंढे यास वाराणसी येथुन ताब्यात घेतले असता त्याने सदर गुन्हा केल्याचे कबुल केले असल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर कामगिरी श्री.संजय जाधव, अपर पोलीस आयुक्त, पु.प्रा.वि. कल्याण, श्री.सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर, श्री.सुरेश वराडे, स.पो.आ.अंबरनाथ विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/रमेश पाटील, पोनि(गुन्हे)/तुकाराम पादीर, पोउपनि/एस.एस.शेख, पोहवा/३११२ सैंदाणे, पोहवा/६३१० पादीर, पोहवा/६३४५ वळवी, पोहवा/६५६५ चौधरी, पोहवा/६०४३ खामकर, पोना/७३३६ साळुंके, पोना/७१८४ भोसले, पोना/७३८९ देवरे, पोशि/२४४८ राजगे, पोशि/गायकर, पोशि/मुठे, पोशि/वाघमारे, पोशि/काकडे, पोशि/चत्तर, पोशि/बोडके, पोशि/गायकवाड यांनी पार पाडुन उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर